# SUCCESS KEY TEST SERIES

**WORKSHEET**

**Std: VIII (E.M)** | **Subject: Marathi** | **Time: 1Hrs**

**Date :** | **Chapter 8 & 9** | **Max Marks: 30**

**विभाग १ : गद्य**

**Q.1 (क) खालील उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा:** **(8)**

Q. 1. अ. आकृतीबंध पूर्ण करा. (1)




आ. एका शब्दात उत्तरे लिहा. (1)

i. ज्या गिर्यारोहण संस्थेकडून ईशानला ई-मेल आला ते ठिकाण -

ii. गिर्यारोहणाचा छंद आणि वेद असणारा -

शाळेला सुट्टी लागणार होती. ईशान विचार करत होता, की ही सुट्टी कशी घालवायची? व्हिडिओ गेम खेळून त्याला कंटाळा आला होता. मित्रांबरोबर रोज क्रिकेट , फुटबॉल आणि बॅडमिंटनही खेळता येऊ शकणार होते. शिवाय त्याच त्याच रोमांचक कथा वाचण्यात त्याला विशेष गोडी नव्हती.

ईशान विचार करू लागला, या वेळी सुट्टीमध्ये काहीतरी नवीन करावे. काहीतरी असे केले पाहिजे, की सर्व कंटाळा नाहीसा होईल; परंतु बराच विचार करूनही त्याला सुट्टी घालवण्याचा योग्य पर्याय सापडत नव्हता. तेवढ्यात त्याला दिलासा मिळणारी घटना घडली. त्याला उत्तर काशीच्या गिर्यारोहण संस्थेकडून आपल्या कॉम्प्युटरवर एक ई-मेल प्राप्त झाला. तोच ईशानच्या मित्रांनाही पाठवण्यात आला होता.

गिर्यारोहण संस्थेने त्यांना आपल्या एका मोहिमेमध्ये सहभागी होण्याचे निमंत्रण पाठवले होते.

वास्तविक ईशानला गिर्यारोहणाचा विशेष छंद होता. गिर्यारोहण आता त्याचा छंद राहिला नव्हता , तर त्याचे त्याला वेड लागले होते. त्याने आपल्या शहरातील एका प्रसिद्ध गिर्यारोहण संस्थेत आधीच प्रवेश घेतला होता आणि उत्कृष्ट प्रशिक्षणातून त्याला गिर्यारोहणातील बऱ्याच बारीकसारीक गोष्टी समजल्या होत्या. त्याचे अनेक मित्रही याच संस्थेत गिर्यारोहण शिकत होते आणि त्यांनी ईशानबरोबर पहाडावर अनेक प्रशिक्षण कार्यक्रमांत भाग घेतला होता.

प्र.. 2. अ. रिकाम्या जागा भरा. (१)

i. त्याच त्याच ________ कथा वाचण्यात त्याला विशेष गोडी नव्हती.
(साहसी / रोमांचक / गूढ)

ii. त्याला ________ गिर्यारोहण संस्थेकडून आपल्या कॉम्प्युटरवर एक ई-मेल प्राप्त झाला.
(हिमालयाच्या / लडाखच्या / उत्तर काशीच्या)

आ. उत्तर द्या (2)

ईशानने आपला गिर्यारोहणाचा छंद जोपासण्यासाठी कोणते प्रयत्न केले?

प्र.. 3. अ. खालील शब्दांचे वचन बदलून लिहा. (1)

i. सुट्टी  ii. घटना

आ. समानार्थी शब्द सांगा (1)

i. कथा  ii. मित्र

प्र.. 4. सुट्टीत तुम्ही केलेल्या नवीन उपक्रमाबद्दल लिहा. (2)

**विभाग २ : पद्य**

**Q.2 खालील पदयाच्या आधारे दिलेल्या सूचनेनुसार कृती करा. (8)**

1. खालील आकृतिबंध पूर्ण करा. (2)




वाटते सानुली मंद झुळूक मी व्हावे
घेईल ओढ मन तिकडे स्वैर झुकावे

कधी बाजारी कधी नदीच्या काठी
राईत कधी वा पडक्या वाड्यापाठी
हळु थबकत जावे कधी कानोसा घेत
कधी रमत गमत वा कधी भरारी थेट

लावून अंगुली कलिकेला हळुवार
ती फुलून बघे तो व्हावे पार पसार
परि जाता जाता सुगंध संगे न्यावा
तो दिशादिशांतुनी फिरता उधळुनी द्यावा

गाण्याची चुकलीमुकली गोड लकेर
झुळझुळ झऱ्याची पसरावी चौफेर
शेतात पाचुच्या , निळ्या नदीवर शांत
खुलवीत मखमली तरंग जावे गात

वेळूच्या कुंजी वाजवुनी अलगूज
कणसांच्या कानी सांगावे हि तगूज
शिंपावी डोही फुले बकुळीची सारी
गाळुनी जांभळे पिकली भुळभुळ तीरी

दिनभरी राबुनी दमला दिसता कोणी
टवटवी मुखावर आणावी बि लगोनी
स्वच्छंद अशा या करुनी नाना मौजा
घ्यावया विसावा यावे मी तिन्हीसांजा

प्र. २. अ) योग्य पर्याय निवडून वाक्य पूर्ण करा (1)

i. झुळकेला स्वैर झुकावे वाटते, कारण

(१) तिला स्वातंत्र्य हवे असते.

(२) तिला सर्वत्र हिंडायचे असते.

(३) तिचे मन तिकडे ओढ घेते.

(४) ति ला लोक आमंत्रण देतात.

ख) वेळूच्या वनात अलगूज वाजते, कारण

(१) झुळूक स्वतःच गाणे गाते.

(२) तिथे गुराखी अलगूज वाजवतो.

(३) तिथे ध्वनिफित लावलेली असते.

(४) झुळकेच्या स्पर्शामुळे वेळूतून अलगूजाचा आवाज निघतो.

आ) एका वाक्यात उत्तरे लिहा (2)

i. झुळूक कोणाच्या मुखावर टवटवी आणणार आहे?

ii. झुळूक सुगंध घेऊन केव्हा पसार होणार आहे?

प्र. 3. 'झुळूकेची परोपकारी वृत्ती' तुमच्या शब्दात स्पष्ट करा. (2)

प्र. 4. तुम्ही झुळूक झालात तर काय कराल? (2)

**विभाग ३ : व्याकरण**

**Q.3 (क) वाक्याचे प्रकार ओळखा** **2**

**(i)** घाटात घाट वरंधा घाट, बाकी सब घाटीयाँ!

**(ii)** आणि माझ्यामुळेच तर माणसांच्या जीवनात अर्थ आहे.

**(ख) विरुद्धार्थी शब्द लिहा** **2**

**(i)** फायदा

**(ii)** सुख

**(ग) खालील वाक्यातील योग्य ठिकाणी विरामचिन्हांचा वापर करून वाक्य पुन्हा लिहा.** **2**

**(i)** हो हो आमची तयारी आहे

**(ii)** तो म्हणेल तेवढच खायची सक्ती असते माझ्यावर

**(घ) पुढील शब्दसमूहासाठी इंग्रजी प्रतिशब्द लिहा** **3**

**(i)** धाडस, धिटाई

**(ii)** डोंगर चढणीचा प्रवास

**(iii)** आनंद घेणे

**विभाग ४ : उपयोजित लेखन**

**Q.4 पुढील विषयावर निबंध लिहा:** **5**

निसर्ग माझा सोबती

**-------- All the Best --------**